# विद्यार्थ्यांनो आव्हानांना निर्भीडपणे सामोरे जा

## संरक्षणमंत्र्यांचे आवाहन : 'बिट्स पिलानी'चा पदवीदान सोहळा उत्साहात




**झुआरीनगर : 'बिट्स पिलानी'मध्ये पदवीदान सोहळ्यात सुवर्णपदक प्राप्त विशाखा गुप्ता यांनी पदवी प्रदान करताना संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर. बाजूस डॉ. कुमार मंगलम बिर्ला, प्रा. सव्वी भट्टाचार्य व शशी पुनेकट.**

(सुनील शेट)

कुठ्ठाळी, ता. ७, (वार्ताहर) : विद्यार्थ्यांनी जीवनात येणाऱ्या कोणत्याही आव्हानांना निर्भीडपणे सामोरे जावे. एखाद्या वेळी हार पत्करावी लागली तरी चालेल. मात्र, त्यापासून खचू नये. सध्या भारत विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये भरीव प्रगती करीत असून येणाऱ्या काळात बिट्स पिलानीमधून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांचा देशाच्या प्रगतीत निश्चितच हातभार लागेल, असा आशावाद संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांनी व्यक्त केला.

आज सकाळी ११ वाजता झुआरीनगर येथील बिट्स पिलानी बिर्ला कॅम्पसमध्ये आयोजित पदवीदान कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर बिट्स पिलानीचे कुलपती डॉ. कुमार मंगलम बिर्ला, उपकुलपती प्रा. सव्वी भट्टाचार्य, बिट्स पिलानीचे संचालक शशी पुनेकट, हैंद्राबादाचे संचालक एस. सी. सुब्रमण्यम उपस्थित होते.

श्री. पर्रीकर म्हणाले की, बिट्स पिलानीसारख्या शिक्षण संस्थेचे अभिनंदन करावे तेवढे कमीच आहे. दोन वर्षांच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने भरीव प्रगती साधली आहे. संरक्षण क्षेत्रामध्ये सुद्धा बिटस्च्या विद्यार्थ्यांचा अवश्य गरज भासेल, असे ते म्हणाले.

कुलपती कुमार मंगलम बिर्ला म्हणाले, १४ वर्षांपूर्वी गोव्यामध्ये बिट्स पिलानीची स्थापना करण्यात मनोहर पर्रीकर यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले. बिट्स पिलानीमध्ये उत्कृष्ट तथा दर्जेदार शिक्षण मिळत असून पदवीधर भविष्यात देशाच्या विकासात निश्चितच योगदान देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पदवीदान कार्यक्रमात एकूण ७५८ पदवीधारकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. यापैकी प्रथम आलेल्या विशाखा गुप्ता (सुवर्णपदक), द्वितीय शहा उजाक दीपक भाय (रौप्यपदक), तृतीय देव मिश्रा हिमांशू व वसुंधरा भार्गवी (कास्यपदक) यांना पर्रीकरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

सुरवातीला संचालक शशिकुमार पुनेकट यांनी बिट्स पिलानीची सविस्तर माहिती दिली. उपकुलपती सव्वी भट्टाचार्य यांनी वार्षिक अहवाल सादर केला. कार्यक्रमाला वीजमंत्री मिलिंद नाईक, आमदार सिद्धार्थ कुंकळ्येकर, डॉक्टर शेखर साळकर, बार्ज मालक संघटनेचे अध्यक्ष अतुल जाधव उपस्थित होते.

Scanned by CamScanner